महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

किंमत २ रुपये

गुरुवार | ०२ जानेवारी २०२५ | वर्ष ६ | अंक - १८८ | पाने - ४

## संपादकीय

### म्हाडाच्या घरांची 'घरघर'

मुंबईतील जमिनीचे गगनाला भिडलेले भाव पाहता मुंबईत घर घेणे हे अशक्य कोटीतील गोष्ट झाली आहे. परंतू म्हाडाच्या घरांच्या किंमती कमी असल्याने मुंबईत घर घेण्याचे स्वप्न काही प्रमाणात पूर्ण होत होते. परंतू गेल्या काहीवर्षांत म्हाडाच्या घरांच्या किंमतीही अवाच्या सवा वाढत चालल्या आहेत. त्यामुळे म्हाडाच्या कोकण मंडळासह इतर मंडळातील म्हाडाची घरे देखील विक्री अभावी पडून असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. म्हाडाची घरे का महाग होत आहेत ? सर्वसामान्यांना स्वस्तात घरे उपलब्ध करुन देण्याच्या म्हाडाच्या हेतूलाच त्यामुळे बाधा बसत आहे.

त्यामुळे म्हाडाच्या कोकण मंडळातर्फे प्रधानमंत्री आवास योजनेत जाहीर करण्यात आलेल्या विरार, कल्याण आणि ठाण्यातील अल्प उत्पन्न गटातील घरांना सोडतीत प्रतिसाद न मिळाल्याने आता ही घरे प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्वावर देण्याचा विचार म्हडाने केला आहे. त्यासाठी प्रातिनिधीक स्वरुपात म्हाडाच्या कोकण मंडळाकडून डिसेंबर महिन्यात मोहिम देखिल राबवली गेली कोकण विभागात विविध ठिकाणी स्टॉलच्या उभारून या घरांविषयी माहिती देण्यात आली मात्र घरांच्या किंमती आणि त्यासाठी असणाऱ्या अटी इतक्या जटील आहेत की ही घरे अजूनही सामान्यांच्या आवाक्याबाहेरच आहेत. त्यामुळे म्हाडाच्या या घर-घर मोहिमेला अपेक्षित प्रतिसाद मिळाला नसल्याचे समोर आले.

#### म्हाडाची घरे का पडून ?

एक तर म्हाडाच्या घरांच्या किंमती प्रचंड वाढल्या आहेत. मुंबईतील ताडदेव येथील उच्चभ्रु परिसरातील म्हाडाच्या घराची किंमत म्हाडाने साडे सात कोटी रुपये ठेवली होती. त्यामुळे इतक्या महाग घराकडे लोकांनी पाठ फिरविली. इतका पैसा खर्च करणारे लोक प्रायव्हेट बिल्डर्सची सर्व सुविधा असलेली घरेच विकत घेतील, ते कशाला म्हाडाच्या लॉटरीच्या नादाला लागतील ? असा सरळ प्रश्न आहे. तसेच मुंबई वगळता अन्य मंडळात जसे पुणे आणि इतर ठिकाणी घरे विक्री अभावी तशीच पडून असल्याचे दिसत आहे. त्यास मुख्य कारण म्हणजे अनेक ठिकाणी म्हाडाचे प्रकल्प मुख्य शहरांपासून दूरवर आहेत. तेथे पाणी, रस्ते, दळणवळणाच्या अशा आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने या घरांना मागणी नसल्याचे उघडकीस आले आहे. म्हाडाने आधी रस्ते, पाणी, बाजार, दवाखाने, शाळा अशा सुविधा न पाहाताच इमारतींची रचना केल्याने देखील घरे विक्री अभावी पडून असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

म्हाडाने राज्यभर विक्री न झालेल्या धूळ खात पडलेल्या घरांची पडताळणी केली आहे. त्यानुसार कोकण, पुणे, नाशिक, अमरावती, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूरमधील १२ हजारांहून अधिक घरे धूळ खात पडून आहेत. या १२ हजारांहून अधिक घरांची विक्री किंमत तीन हजार कोटींहून अधिक आहे. त्यामुळे म्हाडाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. म्हाडाच्या कोकण मंडळातील विरार-बोळींजमधील दोन हजारांहून अधिक घरे विकली गेलेली नाहीत. मंडळाने दहा हजार घरांचा प्रकल्प तेथे बांधला आहे. परंतु अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्यासारख्या मुलभूत सुविधा नसल्याने येथील घरे विक्री अभावी पडून आहेत.




## संतोष देशमुख हत्याप्रकरणी एसआयटीची स्थापना


### राज्य सरकार कडून नऊ जणांची एसआयटी

### जीआर काढून सरकारची घोषणा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाने संपूर्ण राज्यात संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी अशी मागणी सर्व स्तरातून केली जात आहे. यादरम्यान महाराष्ट्र सरकारने मोठा निर्णय घेत सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या तपासासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन केली आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा सध्या सीआयडीकडून तपास सुरू असून आतापर्यंत दीडशेहून अधिक जाणांची या प्रकरणात चौकशी करण्यात आली आहे. या प्रकरणात दोन कोटींची खंडणी आणि हत्या या दोन्हींच्या संबंधाच्या अनुषंगाने तपास केला जात आहे. दरम्यान या प्रकरणात सीआयडीने आणखी तीन लोकांना चौकशीसाठी समन्स बजावले आहे. पण हे तीन जण कोण आहेत? याबद्दल ची माहिती अद्याप उघड करण्यात आल `ली नाही. या हत्या प्रकरणातील काही आरोपी अद्यापही फरार आहेत, त्यांचा देखील शोध सीआयडीकडून घेतला जात आहे. पीटीआयने यासंबंधीचे वृत्त दिले आहे. तसेच या प्रकरणात आरोप होत असलेल्या वाल्मिक कराड हा पुणे येथे पोलिसांना शरण आला आहे. त्याच्याविरोधात खंडणी प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला बीडमधील केजच्या न्यायालयाने १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. दरम्यान या प्रकरणाच्या चौकशीसाठी स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाचे नेतृत्व आयपीएस बसवराज तेली, पोलीस उपमहानिरीक्षक आर्थिक गुन्हे शाखा, सीआयडी पुणे यांच्याकडे असणार आहे. तर तेली यांच्या नेतृत्वाखालील या विशेष तपास पथकात पोलीस उपअधीक्षक अनिल गुजर, सहायक पोलीस निरीक्षक विजयसिंग जोनवाल, पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने आणि पोलीस उपनिरीक्षक आनंद शंकर शिंदे यांच्यासह पोलीस सहायक पोलीस उपनिरीक्षक तुळशीराम जगताप, पोलिस हवालदार मनोज वाघ, पोलीस नाईक चंद्रकांत काळकुटे, पोलीस नाईक बाळासाहेब अहंकारे आणि पोलीस शिपाई संतोष गित्ते यांचा समावेश आहे.



### वाल्मिक कराडला १४ दिवसांची पोलीस कोठडी

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात असलेल्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे ९ डिसेंबर रोजी अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली होती. आरोपींनी एका पवनचक्की कंपनीकडे मागितलेली खंडणी देण्यास विरोध केल्याने त्यांची हत्या झाल्याचे सांगितले जाते. या प्रकरणात आरोप असलेला वाल्मिक कराड हा गेल्या काही दिवसांपासून फरार होता. वाल्मिक कराडनं मंगळवारी दुपारी अचानक एक व्हिडीओ जारी केला. या व्हिडीओमध्ये त्याच्यावरील सर्व आरोप त्याने फेटाळून लावले. तसेच, दाखल करण्यात आलेला खंडणीचा गुन्हाही अमान्य असल्याचं नमूद केलं. हा व्हिडीओ जारी केल्यानंतर पुढच्या तासाभरात तो पुण्यात सीआयडी पोलिसांच्या स्वाधीन झाला होता. वाल्मिक कराड हा मंगळवारी दुपारी स्वतःहून पोलिसांच्या स्वाधीन झाला. त्यानंतर संध्याकाळी त्याला पुणे पोलिसांनी केज पोलिसांच्या हवाली केलं. तिथे त्याला संध्याकाळी उशीरा न्यायालयात हजर करण्यात आले. सुनावणीनंतर त्याला १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

## नववर्षारंभी मुख्यमंत्री गडचिरोलीत



दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

गडचिरोली, १ जानेवारी

नवीन वर्षाचा पहिला दिवस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज गडचिरोली जिल्ह्यात व्यतित केला. त्यांच्या उपस्थितीत जहाल नक्षली ताराक्कासह ११ नक्षल वाद्यांनी शरणागती पत्करली. देशाच्या स्वातंत्र्यानंतर ७७ वर्षांत प्रथमच अहेरी ते गर्देवाडा अशी बससेवेचा त्यांनी शुभारंभ केला आणि त्या बसमधून प्रवासही केला. लॉईडच्या विविध उपक्रमांचा त्यांनी शुभारंभ केला. यातून ६२०० कोटींची गुंतवणूक होत असून, चार हजारावर रोजगारनिर्मिती होते आहे.

आज सकाळी गडचिरोली जिल्ह्यात आगमन झाल्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे थेट ताडगुडा ब्रीज येथे गेले. गट्टा-गर्देवाडा-वांगेतुरी मार्ग तसेच ताडगुडा पुलाचे त्यांनी लोकार्पण केले. पेनगुंडा येथे त्यांनी जवानांशी आणि ग्रामस्थांशी संवाद साधला. हा परिसर अतिदुर्गम मानला जातो. थेट मुख्यमंत्र्यांनी त्याठिकाणी जात एक वेगळा संदेश दिला. या भागात जाणारे ते पहिलेच मुख्यमंत्री आहेत.

## धूळ आणि धुक्याआड प्रदूषण लपविण्याचा प्रयत्न ?

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

ठाणे - सायंकाळनंतर धूळ आणि धुरक्यात हरवून जाणाऱ्या शहरांत प्रदूषणाचा प्रश्न गंभीर बनत असताना ठाणे जिल्ह्यात या प्रदूषणाचे नेमके मोजमापच होताना दिसत नाही. एकीकडे खासगी संस्था आणि संकेतस्थळांच्या लेखी जिल्ह्यातील बहुतांश भागांत हवेचा स्तर वाईट असताना प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळांवर हवा समाधानकारक असल्याचे दिसत आहे. त्यातच सध्या हवेतील प्रदूषणामुळे आरोग्याच्या तक्रारी वाढत असताना या समाधानकारक शेऱ्यामागे ल पवाछपवी नाही ना अशी शंका उपस्थित होत आहे.

ठाणे जिल्ह्यात मागील काही वर्षांमध्ये मोठ्याप्रमाणात सरकारी प्रकल्प उभारले जात आहेत. त्यासोबतच, ठाणे, डोंबिवली, कल्याण, बदलापूर पट्ट्यात इमारती उभारल्या जात आहेत. जिल्ह्यात कारखान्यांचे प्रमाणही अधिक आहे. त्यामुळे रस्त्यावर धुळधाण तसेच वायू प्रदूषण पसरते. मुंबई उपनगरातील गुणवत्ता वाईट अवस्थेत असताना दुसरीकडे ठाणे जिल्ह्यामध्ये ३१ डिसेंबरला केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावरील हवेची गुणवत्ता समाधानकारक आणि मध्यम असल्याचे दर्शवित आहे. याउलट एक्यूआय डॉट इन संकेतस्थळावर वाईट श्रेणीमध्ये दर्शवित होता. याचा अर्थ आरोग्यासाठी धोकादायक आहे.

ठाणे जिल्ह्यात घोडबंदर येथील कासारवडवली, तीन हात नाका, कळवा, नवी मुंबईतील कोपरी, महापे, शिळफाटा हा भाग अतिशय गजबजलेला असतो. या भागात वाहने, प्रकल्प आणि इतर बांधकामांची निर्मिती होते. परंतु या भागात केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळात आणि खासगी संस्थांकडून केल्या जाणाऱ्या सर्वेक्षणामध्ये मोठी तफावत दिसून येते. प्रदूषणापासून बचावासाठी काही नागरिक डॉ क्टरांच्या सल्ल्याने मुखपट्टीचा वापरत आहेत. हवेच्या गुणवत्तेविषयी वातावरण संस्थेचे संस्थापक भगवान केसभट यांना विचारले असता, ठाणे जिल्ह्यात विविध सरकारी प्रकल्प आणि बांधकामे सुरू आहेत. त्यामुळे ठाणे जिल्ह्यात वायु प्रदूषणामध्ये वाढ होते. ठाणे जिल्ह्याच्या ल ोकसंख्येच्या तुलनेत प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या यंत्रणा अपुऱ्या आहेत. या यंत्रणा वाढविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. नागरिकांमधून खोकला आणि सर्दीचा त्रास होत असल्याच्या तक्रारीही येत आहेत. या विषयी ठाण्यात राहणाऱ्या योगेश गांगुर्डे यांना विचारले असता, रात्रीच्या वेळेत खोकल्याचा त्रास होतो. अनेकदा बाहेर धुरके पसरत असते असेही त्यांनी सांगितले.



### ठाणे जिल्ह्यात प्रदूषणाचे मोजमापच नाही

**शहर किंवा प्रदेशातील जाळयाच्या व्याप्ती आणि तपशीलांमध्ये फरक आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या यंत्रांच्या स्थानांची संख्या कमी आहे. तसेच ते धोरणात्मक पद्धतीने ठेवले जातात. ज्यामुळे व्यापक दृष्टिकोन मिळतो. दुसरीकडे खासगी संस्थांकडून स्थानिक किंवा सूक्ष्म स्तरावर प्रदूषणाचे तपशीलवार निरीक्षण करणारे जास्त प्रमाणात सेन्सर उपलब्ध केले जातात. यामुळे प्रदूषणाचे केंद्र आणि अल्पकालीन वाढीचे निरीक्षण करता येते. जे व्यापक आणि केंद्रीकृत प्रणालीने दुर्लक्षित झाले असते. दोन्ही अहवाल एकत्रित करून हवेच्या गुणवत्तेच्या व्यवस्थापनातील गुंतागुंत अधोरेखित होते आणि याचा समग्रपणे सामना करण्यासाठी विविध निरीक्षण पद्धतींची गरज असते.**

- रोनक सुतारिया, संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, रेस्पायरर लिव्हिंग सायन्सेज.

## वीजबील थकबाकीदारांना सरकारचे 'अभय'

### घरगुती-व्यवसायिक ग्राहकांना ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतनिधी

मुंबई : बिलाच्या थकबाकीमुळे वीज कनेक्शन कायमस्वरुपी तोडलेल्या राज्यातील घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक वीज ग्राहकांसाठी सुरू केलेल्या महावितरण अभय योजना २०२४ ला ग्राहकांच्या मागणीनुसार ३१ मार्च २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. या योजनेंतर्गत वीजबिलाच्या थकबाकीवरील संपूर्ण व्याज आणि विलंब आकार माफ होत असल्यामुळे वाढीव मुदतीत ग्राहकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले. राज्यातील महावितरणच्या ३१ मार्च २०२४ पर्यंत थकीत बिलामुळे कायमस्वरुपी वीज पुरवठा (र्तेंमूमूब) खंडित झालेल्या (पीडी) ग्राहकांसाठी १ सप्टेंबरपासून अभय योजना सुरू करण्यात आली. या योजनेचा कालावधी ३० नोव्हेंबर रोजी संपल्या नंतर ३१ डिसेंबर पर्यंत एक महिन्याची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु राज्यातील ग्राहकांचा वाढता प्रतिसाद लक्ष्यात घेऊन ही योजना ३१ मार्च २०२५ पर्यंत चालू ठेवण्याचा निर्णय घेतल्यामुळे या योजनेत अजूनही सहभागी होऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांना दिलासा मिळणार आहे. मात्र ३१ मार्च २०२५ नंतर या योजनेला मुदत वाढ न देण्याचा निर्णय महावितरणने घेतला असुन थकबाकी न भरणाऱ्या ग्राहकांवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे. राज्यातील ९३८४८ वीज ग्राहकांनी आतापर्यंत योजनेचा लाभ घेतला असून त्यांच्याकडून १३० कोटी रुपयांचा भरणा झाला असून त्यांना ५७ कोटी ३६ लाख रुपयांचे व्याज व २ कोटी १२ लाख रुपयांचा विलंब आकार माफ झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार कोणत्याही जागेच्या मालक किंवा खरेदीदार किंवा ताबेदार यांनी वीजबिलाची थकबाकी रक्कम भरणे बंधनकारक आहे. रक्कम न भरल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते. त्यामुळे वीज ग्राहकांनी सवलतीचा लाभ घेऊन चिंतामुक्त व्हावे, असे आवाहन महावितरणने केले आहे.अभय योजनेत मूळ बिलाच्या ३० टक्के रक्कम भरून उर्वरित ७० टक्के रक्कम सहा हप्त्यात भरण्याची सवलत ग्राहकांना देण्यात आली आहे. जे घरगुती, व्यावसायिक व इतर लघुदाब ग्राहक एकरकमी थकीत बिल भरतील त्यांना दहा टक्के तर उच्चदाब औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांना पाच टक्के सवलत आहे. भिवंडी, मालेगाव, मुंब्रा, शीळ व कळवा या महावितरणच्या फ्रँचायझी क्षेत्रातील वीज ग्राहकांनाही ही योजना लागू आहे.



**राज्यातील ९३८४८ वीज ग्राहकांनी आतापर्यंत योजनेचा लाभ घेतला असून त्यांच्याकडून १३० कोटी रुपयांचा भरणा झाला असून त्यांना ५७ कोटी ३६ लाख रुपयांचे व्याज व २ कोटी १२ लाख रुपयांचा विलंब आकार माफ झाला आहे.**

# रक्तदात्यांचा रक्तकर्ण पुरस्काराने गौरव

## रक्तदानाने नवीन वर्षाचे स्वगात



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**

रक्तानंद ग्रुप महाराष्ट्र या धर्मवीर आनंद दिघे यांच्या संस्थेमार्फ़त इंग्रजी नववर्षाचे स्वागत मध्यरात्रीच्या रक्तदानाने करण्यात आले. शतकोत्तर रक्तदाते रविन्द्र कडणे, शाहू कदम, मंतोष मिश्रा यांच्या सह या वर्षाचा राज्यस्तरीय रक्तकर्ण पुरष्कार उल्हासनगर येथील डॉ प्रकाश माळी यांच्या ३० वेळा केलेल्या रक्तदानाबद्दल यांना प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाला धर्मवीर आनंद दिघे यांचे पुतणे ठाणे जिल्हा प्रमुख केदार दिघे, जिल्हा प्रमुख धनंजय बोडरे, ज्येष्ठ शिवसैनिक बाळ हरदास, माजी महापौर रमेश जाधव, उपजिल्हा प्रमुख तात्या माने, विजय देसाई, माजी नगरसेवक महेश गायकवाड, हर्षवर्धन पलांडे, पुरुषोत्तम चव्हाण, अशोक म्हात्रे, हेमंत चौधरी, किरण निचळ, उपशहर संघटिका सुनीता ढोले, शेखर पिसाळ, अमित उगले, पंकज पांडे, सागर वाळवे, संगीता गांधी, मीनाक्षी कटके,नलिनी कदम, प्रतीक महिले, अभय देसाई आदी मान्यवर उपस्थित होते.

जर कोणी कोणाचा जीव वाचवला तर सरकार त्याला शौर्य पदक देऊन सत्कार करते परंतु निस्वार्थ सेवाभावाने केलेल्या रक्तदात्यांच्या रक्ता मुळे अप्रत्यक्ष रित्या गरजु रुग्णानांचे प्राण वाचवले जातात. दोघेही व्यक्ति प्राण वाचवणारे असतात परंतु एकाला शौर्य पदक दिला जातो आणि एकाची दखल घेतली जात नाही ही शोकांतिका आहे. रक्तानंद हे व्यासपीठ अश्या रक्तदात्यांचा सन्माना करीता रक्तदानाची चळवळ उभी करत आहे अश्या रक्तदात्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच असे प्रतिपादन जिल्हाप्रमुख केदार दिघे यांनी केले.

कार्यक्रमात माजी नगरसेवक तथा शिवसेना शिंदे गटाचे माजी शहरप्रमुख महेश गायकवाड़ यांची उपस्थिति सर्वांचा विशेष लक्ष वेधुन घेत होती. आज जर दिघे साहेब असते तर मी केव्हाच आमदार झालो असतो परंतु हे व्यासपीठ दिघे साहेबांच्या शिकवणीने भारवलेले आहे. रक्तदानसारखे पुण्याचे कार्य २९ वर्ष पर्यंत सातत्याने चालवणे अशक्य असताना रक्तानंद ग्रुपचे संयोजक नारायण पाटिल व त्यांच्या नेतृत्वाखाली शहर प्रमुख ॲड. नीरज कुमार सहित सर्व कार्यकर्त्यांनी शक्य केले. तसेच पुढील महोत्सवी वर्षात सर्व पक्षीय सहभागी होतील असा विश्वाश महेश गायकवाड़ यानी दर्शवला. मध्यरात्रीच्या या शिबिरामधे तिनशे पेक्षा अधिक रक्तदात्यांनी स्वइच्छेने रक्दान केले. नवीन वर्ष सुरू होताच फटाक्याच्या आतिश बाजिने उपस्थितितांचे लक्ष वेधले. कार्यक्रम यशश्वी पार पडण्यासाठी संयोजक नारायण पाटील, जिल्हा समन्वयक ॲड. नीरज कुमार, भूपेंद्र अहिरे, शांताराम डिगे, रविंद्र कडणे, अप्पा अतकरे, प्रमोद गायकवाड, दत्ताराम नार्वेकर, आसिफ शेख, दिनेश साळूखे, संजय पेंढारे, यांनी अथक परिश्रम घेतले.

# 'कल्याण शिधापत्रिका अधिकारी यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा'

**- रूपेश भोईर**

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**

शिधापत्रिका अधिका-याच्या हलगर्जीपणामुळे एक महिलेचे उपचारा अभावी निधन झाले असल्याने कल्याण शिधापत्रिका अधिकारी यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी सहाय्यक पोलिस आयुक्त कल्याणजी घेटे यांना निवेदन देत शिवसेना उबाठा गटाचे विधानसभा सह संघटक रूपेश भोईर यांनी केली आहे.

शिधापत्रिका अधिका-याच्या हलगर्जीपणामुळे एक महिलेचा उपचारा अभावी निधन झाले आहे. कल्याण पश्चिम येथील जुना मच्छी बाजार च्या मरियम चाळीत राहणा-या फिरदोस अब्दुल कलाम अंसारी नावाच्या महिलेच्या ०२/०४/२०२४ रोजी छातीत दुखायला लागला. उपचारा साठी



महिलेला कल्याणच्या मीरा रूग्णालयात भर्ती केले पण तिथल्या चिकित्सकांनी जो खर्च सांगीतला तो त्या महिलेच्या नातेवाईकांना परवडणारा नव्हता.

नातेवाईकांनी शासकीय योजनेचा फायदा घेण्यासाठी धावपळ सुरू केली. त्या साठी रेशन कार्ड पाहिजे होते. परंतु रेशन कार्ड गहाळ झाल्याने ते मिळत नव्हते, त्याची फक्त झेरॉक्स प्रत नातेवाईकांकडे होती. नातेवाईकांनी त्या झेराक्स च्या आधारे शिधापत्रिका अधिका-याला विनंती केली की आम्हाला झेरॉक्स च्या आधारे नवीन शिधापत्रिका तात्काळ बनवून द्या. पण शिधापत्रिका अधिका-याने काही लक्ष दिले नाही.

कार्यालयातील काही कर्मचारी महिलेच्या नातेवाईकांकडून आर्थिक अपेक्षा ठेऊन पाच दिवसांनी या असे सांगितले, पांच दिवसांनी गेल्यावर आठवड्या नंतर या असे बोलायला लागले. महिलेच्या नातेवाईकांकडून नवीन शिधापत्रिका साठी दहा ते पंधरा हजार रूपयांची मागणी केली जात होती. हि सगळी धावपळ करताना महिलेचा उपचारा अभावी निधन झाले.

योग्यवेळी महिलेला शिधापत्रिका मिळाली असती तर कदाचित महिलेचे प्राण वाचले असते. त्यामुळे या महिलेच्या मृत्यूला कल्याणचे शिधापत्रिका अधिकारी जवाबदार असल्याचा आरोप भोईर यांनी केला आहे. या प्रकरणी चौकशी करून शिधापत्रिका अधिका-यावर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशा आशयाचे निवेदन रूपेश भोईर यांनी सहाय्यक पोलीस आयुक्त यांना दिले आहे.

# थर्टी फर्स्टच्या रात्री ३२० जणांविरोधात कारवाई

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी) :**

कल्याण परिमंडळ ३ मधील विविध पोलीसस्टेशन अंतर्गत मोकळी मैदानी, निर्जनस्थळे व रोडवरील आस्थापना यांच्यावर पोलिसांतर्फे धडक कारवाई सुरुबअसून ३१ डिसेंबर अनुषंगाने विहित वेळेपेक्षा सुरू असलेल्या ३५ आस्थापनावर कारवाई. तसेच उघड्यावर व निर्जस्थळी नशेखोरांवर एकूण ७५ कारवाई करण्यात आली आहे. रात्री या ठिकाणी आशा एकुण ११० कारवाई करण्यात आली आहे.

तसेच रोडवरील अती वेगाने मोटार सायकल चालवणे आणि ट्रिपल सीट वाहन चालवणे. ड्रंक अँड ड्राईव्ह २१० करवाई अशा प्रकारे एकूण ३२० कारवाई कल्याणमध्ये पोलिसांकडून करण्यात आल्या आहेत. पोलिसांची अशीच धडक कारवाई मोहिम यापुढेही सुरू राहणार असल्याची माहिती पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी दिली.

## तालुका कृषी अधिकारी कार्यालय माणगाव व कृषी विज्ञान केंद्र किल्ला यांच्या संयुक्त विद्यमाने

# शेतकरी समुह गटाचे नैसर्गिक शेती प्रशिक्षण संपन्न

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ बोरघर(विश्वास गायकवाड)**

तालुका कृषी अधिकारी कार्यालय ,माणगाव व कृषि विज्ञान केंद्र किल्ला रोहा यांचे संयुक्त विद्यमानाने मा. प्रकल्प संचालक आत्मा अलिबाग रायगड यांचे मार्गदर्शनाखाली दिनांक ३०-३१ डिसेंबर २०२४ डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन संन २०२४-२५ अंतर्गत संस्था पातळीवरील शेतकरी समूह गटाचे नैसर्गिक शेती या विषयाचे प्रशिक्षण घेण्यात आले.

पहिला दिवस या प्रशिक्षणामध्ये माननीय तालुका कृषी अधिकारी माणगाव श्री किरण पडवळकर यांनी प्रस्तावनेमध्ये नैसर्गिक शेतीचे महत्व , सेंद्रिय शेतीच्या मार्गदर्शक







सूचना व अंमलबजावणी , नैसर्गिक शेती योजना तालुक्यांमध्ये तीन वर्षांमध्ये कशा पद्धतीने राबविली जाणार आहे याबाबत सर्विस्तर माहिती देण्यात आली. कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ.मनोज तलाठी यांनी बाजारपेठे मधील नैसर्गिक शेती मधील संधी, उत्पादनाला असलेले वाढती मागणी याबाबत मार्गदर्शन केले. तसेच कृषी विज्ञान केंद्रा मार्फत शेतकऱ्यांसाठी नैसर्गिक शेतीचे विविध उपक्रम, निविष्ठा तयार करण्याबाबत सविस्तर माहिती दिली. कृषि विज्ञान केंद्र किल्ला रोहा यांचे शास्त्रज्ञ डॉ. आर .जी.मांजरेकर यांनी दहा ड्रम थेरी यामधील उत्पादन करण्यात येणाऱ्या नैसर्गिक निविष्टांबाबत , दशपर्णी अर्क तसेच विविध नैसर्गिक उत्पादनाबद्दल माहिती दिली.कृषि विज्ञान केंद्र किल्ला रोहा यांचे शास्त्रज्ञ डॉ.एस.एस.कार्ले यांनी सेंद्रिय शेती ,व्यवसाय व संधी ,बाजारपेठ तसेच शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करणे ,मूल्यासाखळी बाबत , सेंद्रिय शेती प्रमाणीकरण, याबाबत सखोल मार्गदर्शन केले. दुसऱ्या दिवशी कृषि विज्ञान केंद्र किल्ला रोहा यांचे शास्त्रज्ञ डॉ. आर .जी. मांजरेकर यांनी प्रक्षेत्र भेटीमध्ये १० ड्रम थेअरी , दर्शपर्णी अर्क ,DF द्रावण, फळ अर्क ,मासे अर्क, बिजामृत, जिवामृत, अश्या विविध सेंद्रिय निविष्ठा निर्मिती बद्दल प्रशिक्षण देण्यात आले आणि विविध निविष्ठा बनवण्याचे प्रात्यक्षिक शेतकऱ्यांना दाखविण्यात आले .तसेच प्रक्षेत्र भेटीमध्ये सेंद्रिय पद्धतीने लागवड केलेले भाजीपाला उत्पादन शेतकऱ्यांना दाखवण्यात आले.

यावेळी उपस्थित शेतकरी गटातील सदस्यानी आपल्या मनोगतमधे असे प्रशिक्षण जास्तीत जास्त प्रमाणात राबविण्यात यावे असे सांगितले. या प्रशिक्षणासाठी तालुक्यातील २१ शेतकरी गटातील ९५ शेतकरी सहभागी झाले होते.

# नागपूर मडगांव साप्ताहिक एक्स्प्रेसला मुदतवाढ | पेणला थांबा नाही

**दैनिक ठाणे जीवन दिप वार्ता पेण(प्रतिनिधी)**

नागपुर ते मडगाव (गोवा) दरम्यान धावणाऱ्या द्वितीय साप्ताहिक विशेष रेल्वे २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे खान्देश,विदर्भ ते कोकण चालणार आहे मात्र कोकणातील पेणला थांबा नसल्याने पेणकरांना प्रतिक्षा पहावी लागणार आहे.

खान्देश,विदर्भातुन थेट कोकण रेल्वे मार्गावर येण्यासाठी उपलब्ध नसल्याने अशा रेल्वेची मागणी वारंवार रेल्वे प्रवासी संघटनांकडून केली जात होती मकर संक्रांत,महाशिवरात्र सणाच्या पार्श्वभूमीवर ०११३९/०११४० नागपुर जं ते मडगाव ही आठवड्यातून दोनदा धावणारी गाडी आता २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत चालवली जाणार आहे

सुधारित वेळापत्रकानुसार ही गाडी नागपुर जं ते मडगाव (गोवा) पर्यंत चालवली जाणार आहे त्यानुसार ही गाडी नागपुर येथून दर बुधवार,शनिवारी दु.०३.०५ वाजता सुटून गुरुवार,रविवारी मडगाव गोवा दुसऱ्या दिवशी सायं ०५.४५ वाजता पोहोचेल

मडगाव गोवा ते नागपुर दरम्यान धावताना हि गाडी ०११४० गुरुवार, रविवारी मडगाव गोवा येथून रा.०८.०१ वाजता सुटून दुसऱ्या दिवशी रात्री ०९.४५ वाजता नागपुर जं येथे पोहोचेल.

नागपुर ते मडगाव (गोवा) या प्रवासात गाडी वर्धा पुलगाव धामणगाव,बडनेरा जं,अकोला जं,शेगांव, मलकापूर,भुसावळ जं,नाशिक रोड,ईगतपुरी,कल्याण जं,पनवेल जं,रोहा,माणगाव,खेड,चिपळूण,संगमेश्वर रोड,रत्नागिरी,राजापूर रोड, कणकवली,कुडाळ,सावंतवाडी रोड,थिवीम,करमाळी या स्थानकांवर थांबणार आहे या दोन महिन्यांच्या कालावधीत या विशेष रेल्वेच्या दोन्ही बाजुच्या मिळुन ३४ फेऱ्या होणार आहेत या रेल्वेसेवेचे संगणकीय आरक्षण www.enquiry.indianrail.gov.in,www.irctc.gov.in व NTES,Indian Rail Connect ॲपवर भारतीय रेल्वेच्या आरक्षण खिडकीवर आरक्षणादि.२९ डिसेंबर २०२४ पासुन सुरु करण्यात आले आहे.

नागपुर जं मडगाव नागपुर प्रतिक्षा द्वितीय साप्ताहिक एक्स्प्रेसचा अधिकाधिक प्रवाशांनी लाभ घ्यावा असे आवाहन रेल्वे प्रवासी सामाजिक संस्था कल्याण सावंतवाडी(रजि.) संस्थापक अध्यक्ष सुनिल उत्तेकर,पुणे कल्याण सावंतवाडी रेल्वे प्रवासी समिती मुंबई संस्थापक अध्यक्ष यशवंत परब,राष्ट्रीय रेल्वे महिला प्रवासी संघटना शेगांव(रजि.) सौ माधुरी शर्मा,राष्ट्रीय रेल्वे प्रवासी संघटना शेगांव अध्यक्ष राजकुमार व्यास,विदर्भ खान्देश मराठवाडा संपर्कप्रमुख वैभव बहुतूले, देवगड संपर्कप्रमुख ओमकार उमाजी माळगांवकर,कुडाळ ठाणे संपर्कप्रमुख चैतन्य धुरी,मंडणगड संपर्कप्रमुख संदेश गांधी बस प्रवासी संघटना शेगांवच्या कुमारी कुसुम चौहान,प्रवासी सुधीर राठोड,अनिल राठोड,दिपक सोनवणे,विदर्भ-खान्देश कृषी-मेडिकल विद्यापीठ-मेडिकल कॉलेजातील विद्यार्थी-विद्यार्थीनी वर्गाकडून करण्यात आले आहे

# ग्रामीण भागातील रस्त्यांची कामे पारदर्शक व गुणवत्तापूर्ण करावी

**– ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे**

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता मुंबई(प्रतिनिधी) :**

प्रधानमंत्री ग्राम सडक योजना व मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या माध्यमातून तयार करण्यात येणाऱ्या रस्त्यांच्या कामात पारदर्शक व गुणवत्तापूर्ण कामाला प्राधान्य द्यावे, असे निर्देश ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.
मंत्रालयात प्रधानमंत्री ग्राम सडक योजना व मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या तसेच कंत्राटी कामगार वेतन थकबाकीबाबत आढावा बैठक झाली. यावेळी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे सचिव सतिश चिखलीकर, वित्तीय नियंत्रक अभय धांडे, उपसचिव प्रशांत पाटील, कार्यासन अधिकारी विवेक शिंदे, अच्युत इप्पर, विजय चौधरी उपस्थित होते.
ग्रामविकास व पंचायतराज मंत्री श्री. गोरे म्हणाले की, प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतील निकषात बदल करण्यासाठी केंद्र सरकारसोबत चर्चा करण्यात येईल, जेणेकरुन कामात सुलभता निर्माण होईल. ग्रामीण भागातील रस्त्यांचे जाळे विस्तारण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्यात यावेत. ग्रामीण तसेच मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत पुढील कामे मंजूर करण्यासाठी बाह्य वित्तीय संस्थांकडून आर्थिक मदत घेण्याबाबत प्रयत्न करावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. कंत्राटी कामगार वेतन थकबाकीसंदर्भातील आढावाही यावेळी घेण्यात आला.


# माजी आमदार प्रदीप नाईक यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांची श्रद्धांजली

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/मुंबई(प्रतिनिधी) :**

'किनवटचे माजी आमदार प्रदीप नाईक यांच्या निधनाने धडाडीचा लोकप्रतिनिधी, कर्तव्यनिष्ठ लोकसेवक हरपला आहे. त्यांच्या निधनाने किनवटच्या सामाजिक जीवनाशी घट्ट नाळ जुळलेले व्यक्तिमत्त्व हरपले आहे. किनवट विधानसभा मतदारसंघाच्या विकासात त्यांनी दिलेले योगदान कायम स्मरणात राहील. दिवंगत प्रदीप नाईक यांच्या कुटुंबियांच्या, सहकाऱ्यांच्या, कार्यकर्त्यांच्या दुःखात आम्ही सर्वजण सहभागी असून मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहतो.' अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त करुन श्रद्धांजली वाहिली.

दैनिक जीवनदीप वार्ता
मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र,घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातींना केवळ ५००/- रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.
:: कार्यालय ::
९६१९१८८५५८ / ९१५८०७८६०१
- E Mail
-jeevandeepvartanews2020@gmail.com
news.thanejeevandeep@gmail.com

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता नवी मुंबई(प्रतिनिधी) :**

नवी मुंबई महानगर पालिकेमार्फत दरवर्षी ३ जानेवारी रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीदिन नानाविध उपक्रम राबवून उत्साहाने साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगर पालिका कार्यक्षेत्रातील महिला व मुलींकरिता रांगोळी, मेहेंदी, निबंध, पाककला, सॅलेड सजावट, टाकाऊपासून टिकाऊ वस्तू तयार करणे, नृत्य व गायन स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील महिला व बाल कल्याण क्षेत्रामध्ये उत्कृष्ट काम करणा-या सामाजिक संस्था / महिला मंडळे यांना क्रांतीज्योजी सावित्रीबाई फुले पुरस्काराने सन्मानित करण्यात येत असते.या अनुषंगाने रांगोळी स्पर्धा, योगासने, नृत्य व गायन घेण्यात आल्या असून पाककला, सॅलेड सजावट व टाकाऊपासून टिकाऊ वस्तू तयार करणे या स्पर्धा दि. ०३ जानेवारी २०२५ रोजी विष्णुदास भावे नाट्यगृह, वाशी या ठिकाणी घेण्यात येणार आहेत. ३ जानेवारीच्या कार्यक्रमात विविध स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ, सावित्रीबाई फुले पुरस्कार प्रदान समारंभ तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम हे प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहेत. तरी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील जास्तीत जास्त महिला / महिला मंडळे / महिला बचत गट यांनी दि. ०३ जानेवारी २०२५ रोजी विष्णुदास भावे नाट्यगृह, वाशी या ठिकाणी सकाळी ९.३० वाजल्यापासून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमास आवर्जून उपस्थित रहावे, असे जाहीर आवाहन नवी मुंबई महानगर पालिकेमार्फत करण्यात येत आहे.





०२ जानेवारी २०२५ गुरुवार

**मेष**
तुमच्या स्वतःच्या विचारांसोबतच तुम्हाला इतर लोकांच्या विचारांकडेही लक्ष देण्याची गरज आहे. उत्पन्नाचे स्त्रोत वाढल्याने खर्चही जास्त राहील.

**वृषभ**
तुमचे काम अधिक सोपे होईल. जवळच्या लोकांच्या भेटीमुळे फायदा होईल.तुमच्या जोडीदाराच्या पाठिंब्याने तुम्हाला काही मोठ्या कामात यश मिळेल.

**मिथुन**
जे तुम्ही संयमाने सोडवाल.तुम्हाला समस्येचे निराकरण देखील मिळेल. आज तुम्हाला तुमच्या पालकांकडून स्नेह मिळेल.वेळ कामात जाईल.

**कर्क**
आज तुम्ही तुमचा जोडीदार आणि कुटुंबासोबत मनोरंजनात आणि कुटुंबातील सदस्यांसोबत थोडा वेळ घालवाल. यामुळे मन प्रसन्न राहील.

**सिंह**
तुमची आर्थिक स्थिती पूर्वीपेक्षा चांगली असेल.आज तुमचे आरोग्य चांगले राहील.तुमच्यासाठी चांगल्या ठरू शकतात.आत्मविश्वास जाणवेल.

**कन्या**
करिअरमध्ये नवीन सुरुवात करण्याचा विचार करतात. त्यांच्यासाठी आजचा दिवस शुभ आहे.काही महत्त्वाच्या कामासाठी परदेश प्रवास करू शकतात.

**तूळ**
तुम्ही ज्यांच्या संपर्कात याल त्यांच्याशी प्रेमाने वागाल. तुमच्या विचारांमध्ये स्थिरता आणि दृढनिश्चय आल्याने तुम्ही तुमचे काम चांगल्या प्रकारे करू शकाल.

**वृश्चिक**
आजचा दिवस चांगला आहे.तुम्हाला अशी एखादी व्यक्ती भेटू शकते जी तुम्हाला भविष्यात नक्कीच लाभदायक ठरेल. कुटुंबातील सदस्यांचा सल्ला घ्या.

**धनु**
प्रवास लाभदायक होईल. व्यवसायाच्या बाबतीत सावधगिरी बाळगण्याची गरज आहे. सध्या कामाचा वेग मध्यम राहील. कठीण काळ संयमाने निघून जाईल.

**मकर**
हितचिंतकांकडूनही तुम्हाला पूर्ण सहकार्य मिळेल.नवीन अभ्यास क्रमात सहभागी होण्यासाठी आजचा दिवस शुभ आहे. संयमाने कामे पूर्ण करा.

**कुंभ**
तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत घरातील महत्त्वाच्या कामात मदत करू शकता. तुम्हाला कोणतेही काम करताना अनेक आव्हानांचा सामना करावा लागेल.

**मीन**
समाजाशी संबंधित कामांमध्ये तुमच्या कल्पनांना विशेष प्राधान्य मिळेल. तरुणांना त्यांच्या इच्छेनुसार काही काम करून दिलासा मिळेल.

नियमित वाचा
दै. ठाणे जीवनदीप वार्ता

### म्हसा यात्रेच्या नियोजनासाठी

# सरपंच जया घागस यांची आ.किसन कथोरेंशी चर्चा



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**मुरबाड(दिलीप पवार)**

संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेली मुरबाड तालुक्यातील खांबलिंगेश्वर म्हसा यात्रेला येत्या१३ जानेवारी २०२५ पासून सुरूवात होत असून यात्रा शांततेत व निर्विघ्न पार पडण्यासाठी म्हसा ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ.जया प्रविण घागस यांनी मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे यांची भेट घेऊन विविध विषयांवर चर्चा केली. यावेळी आमदार कथोरे यांनी योग्य ते मार्गदर्शन करून मी संबंधित सर्व विभागाच्या प्रमुखांशी चर्चा केली असून मी सर्वांना तसे निर्देश दिले असल्याचे सांगितले .तसेच म्हसा यात्रेत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी यात्रा शांततेत पार पडण्यासाठी मुरबाड पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोज कामत तसेच तहसिलदार अभिजित देशमुख यांची भेट यात्रे संदर्भात चर्चा केली असून म्हसा यात्रेत येणाऱ्या यात्रेकरूंसाठी सर्व सोयी सुविधा पुरविल्या जाणार असल्याचे म्हसा ग्रामपंचायतच्या सरपंच जया घागस यांनी सांगितले.

# मानव सेवा सामाजिक संस्थेच्या वतीने आरोग्य शिबिर संपन्न



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**मुरबाड(प्रतिनिधी)**

मानव सेवा सामाजिक संस्था, महागणपती मल्टी स्पेशलिस्ट हॉस्पिटल टिटवाळा व इन्फिगो आय केअर हॉस्पिटल मुरबाड यांच्या संयुक्त विद्यमाने मुरबाड तालुक्यातील टाकीची वाडी येथील आदिवासी बांधवांसाठी मानव सेवा सामाजिक संस्थेचे अध्यक्ष मा. सुरेश बांगर यांच्या मार्गदर्शना खाली २८ डिसेंबर २०२४ रोजी महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश बांगर यांनी केले. या कार्यक्रमासाठी भाजपचे अनिल वायले, माजी नगराध्यक्ष मोहन सासे, सुभाष कडव, संतोष कडव, निलेश गायकर अदि मान्यवर व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. या आरोग्य तपासणी मध्ये ९५ नागरिकांनी सहभाग घेतला तर डोळे तपासणीसाठी ६५ नागरिकांनी सहभाग घेतला. शिबिर आयोजित केल्याबद्दल आदिवासी बांधवांनी मानव सेवा संस्थेचे तसेच त्यांच्या सर्व टीमचे आणि सर्व हॉस्पिटल कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

# लेखक गिरीश कंटे यांना मुरबाडरत्न पुरस्कार प्रदान



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**मुरबाड(बाळासाहेब भालेराव)**

मुरबाड तालुक्यातील डॉक्टर्स अँड इंजिनियर्स फाऊंडेशन क्लब चे वतीने मानाचा समजला जाणारा मुरबाड रत्न हा पुरस्कार तालुक्यातील लेखक गिरीश कंटे यांना मान्यवरांच्या उपस्थितीत नागाव येथे त्यांच्या राहत्या घरी प्रदान करण्यात आला. गेली अनेक वर्ष साहित्य क्षेत्रात विपुल लेखन करणारे गिरीश कंटे यांनी सामाजिक बांधिलकी जपत आपल्या लिखाणाची दिशा ठरवली आहे.मुरबाड तालुक्यातील स्वातंत्र्य लढा तळागाळात पोहचावा म्हणून सिद्धगड येथे घडलेल्या हुतात्मा भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील यांचा क्रांती लढा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहचवला आहे.साहित्य आणि संस्कृती यावर अभ्यास करून मौखिक परंपरेने चालत आलेल्या गीतांचे संकलन , मुरबाडी बोलीभाषा मधून कथा संग्रह,अनेक कविता संग्रह,चरित्र लेखन करून समाजापुढे आदर्श निर्माण केला आहे.त्यांच्या लेखणीची दाखल घेवुन अनेक विविध पुरस्काराने आजवर त्यांना सन्मानित केले गेले आहे.

डॉक्टर्स अँड इंजिनियर्स फाऊंडेशन क्लबचे माध्यमातून त्यांना हा मुरबाड रत्न पुरस्कार जाहीर झाल्यावर क्लबचे माध्यमातून त्यांना हा पुरस्कार त्यांच्या घरी एका कार्यक्रमात देण्यात आला त्यावेळी अनेक मान्यवर व्यक्ती उपस्थित होत्या.उपस्थितांनी त्यांच्या लेखणीचे कौतुक केले आणि त्यांना पुढील कार्यास हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# धान-भरडधान्य खरेदीसाठी शासकीय पोर्टलवर मुदतवाढ

### अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांची माहिती



**दैनिक ठाणे जीवन दिप वार्ता**
**मुंबई(प्रतिनिधी)**

शासकीय खरेदी केंद्रावर धान/भरडधान्य विक्रीसाठी शासनाच्या ऑनलाइन पोर्टलवर नोंदणी करणे अनिवार्य आहे. त्याकरिता ३१ डिसेंबरपर्यंतची मुदत होती. मात्र अनेक शेतकरी नोंदणीपासून वंचित असल्याने विविध लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार शासनाने नोंदणीसाठी १५ जानेवारी २०२५ पर्यंत मुदतवाढ दिल्याची माहिती अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे. शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी दर मिळू नये यासाठी महाराष्ट्र राज्य को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन आणि आदिवासी विकास महामंडळाच्या माध्यमातून धान/ भरडधान्य खरेदी केले जाते. त्यासाठी ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया अनिवार्य करण्यात आली आहे. खरीप पणन हंगाम २०२४-२५ मध्ये शेतकरी नोंदणीकरिता ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत अंतिम मुदत होती. मात्र अनेक भागातील शेतकरी नोंदणीपासून वंचित असल्याने शासनाने नोंदणीसाठी मुदतवाढ द्यावी अशी मागणी अर्थ व नियोजन विभागाचे राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार, आमदार राजू कारेमोरे यांच्यासह विविध लोकप्रतिनिधींनी केली होती. या मागणीस अनुसरून शेतकरी नोंदणीची मुदत १५ जानेवारी २०२५ पर्यंत वाढवण्यात आली आहे. याबाबत अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या उपसचिव राजश्री सारंग यांनी महाराष्ट्र राज्य को ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन आणि महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळासह संबंधित एजन्सी यांना याबाबत कळवले आहे. ही मुदतवाढ अंतिम असून विहित मुदतीत शेतकऱ्यांनी नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन श्री. मुंडे यांनी केले आहे.

### तेथे कर माझे जुळती

# क्रांतिरत्न विष्णु गणेश पिंगळे



२ जानेवारी १८८८ - १६ नोव्हेंबर १९१५

भारताच्या क्रांती लढ्यात जे श्रेष्ठ क्रांतिकारक चमकले त्यात विष्णु गणेश पिंगळे यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. दुर्दम्य स्वातंत्र्यलालसा ,शस्त्रे व स्फोटके हाताळण्यातील प्राविण्य ,अफाट कर्तृत्व शक्ती व गुप्त कट संघटित करण्याची कुशलता याबरोबरच धाडसी मनोवृत्ती, संकटात उडी घेण्याची धडाडीआणि प्रकर्षाने आढळणारे जहाल व्यक्तिमत्व ही विष्णू पिंगळे यांची वैशिष्ट्ये होत. विष्णूचा जन्म २ जानेवारी १८८८ रोजी पुणे जिल्ह्यातील तळेगाव ढमढेरे या ठिकाणी झाला. त्यांचे वडील गणेश पंत न्यायालयात आवेदन लेखक होते . तळेगावच्या राष्ट्रीय शाळेत त्यांनी शिक्षण घेतले तेथील न्यू इंग्लिश स्कूल येथून ते मॅट्रिक झाले.

तत्कालीन राष्ट्रीय जहाल वृत्ती असणारी आणि त्यामुळे राष्ट्रीय वृत्तीची जोपासना करणारी विद्यालये ब्रिटिश सरकारच्या डोळ्यात सलत होती. अशी विद्यालये त्यांनी बंद केली.१९१० साली विष्णू पिंगळे शिकत असलेल्या समर्थ विद्यालयाचा बळी घेण्यात आला.ते बंद करण्यात आले .त्यावेळी गोविंदराव पोतदार क्रांतिनिष्ठ तरुणांमध्ये फार लोकप्रिय होते. ते १९०७ साली जपान हून परत आले व त्यांनी माहीमला वेस्टर्न मॅन्युफॅक्चरिंग कंपनी काढली .कंपनीत वॉशिंग सोडा, बटणे इत्यादी वस्तू बनत. त्यांनीच बॉम्ब कसे बनवावे हे ४५ पानांचे पुस्तक सेनापती बापट यांना पाठविले. या कंपनीतच पिंगळे काम करीत होते. ध्येयनिष्ट तरुण कधी स्वस्त बसत नाही .पिंगळ्यांचेही तेच झाले .पोतदार स्फोटक तज्ञ राष्ट्रीय वृत्तीच्या लोकांमध्ये त्यांचा प्रतिष्ठित लोकांना परिचय होत असे.त्यावेळी देशात स्वातंत्र्याचे आंदोलन सुरू होते. पिंगळे हे राष्ट्रीय वृत्तीचे होते .क्रांतिकारकांच्या गुप्त संघटना कार्यरत झालेल्या होत्या. बॉम्बस्फोटांचा आवाज ऐकूनच पिंगळ्यांचे रक्त उसळले .त्यांनी नोकरी करून बरेच पैसे जमविले व अभियांत्रिकीच्या उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत जाण्याचे ठरविले पण जाताना घरात कोणालाही न सांगता त्यांनी आपले वडील बंधू केशवराव यांनाच त्याबाबत सांगितले.

कमवा आणि शिका या तत्त्वावर त्यांनी अमेरिका येथे पैसे जमविले व विश्वविद्यालयाची परीक्षा दिली. त्यांच्या ठाई मातृ पित्रूभक्ती कमालीची होती.

**१८५७ च्या बंडाच्या पुनरावृत्ती चे नियोजन**

या कालखंडात लाला हरदयाळ ,पंडित काशीराम इत्यादी अनेक क्रांतिकारकांनी हिंदुस्तान असोसिएशन ऑफ पॅसिफिक कॉस्ट व इंडियन इंडिपेंडेंस लीग ची स्थापना केली .ऑस्ट्रेलिया सेंट जॉन सॅक्रामंटो व स्कॉटलंड इत्यादी ठिकाणी व्याख्याने दिली. बॉम्ब तयार करण्यासाठी लागणारी आवश्यक स्फोटके बनविण्याचे सूक्ष्मज्ञान मिळविले. याच सुमारास बाबा गुरु दत्तांच्या नेतृत्वाखाली कोमागाटा मारू हे जहाज कॅनडास पोहोचले .पण बोटीवरील हिंदी प्रवाशांना तेथे प्रवेश नाकारला गेला .

इंग्रजांचे राज्य उलथून पाडण्यासाठी निघालेल्या क्रांतिकारकांचे ते जहाज होते. पिंगळ्यांनी अनेक युवकांना क्रांतिकारक बनवले. पिंगळे स्वतः गुप्तपणे भारतात आले. कलकत्त्यात त्यांनी क्रांतिकारकांशी संपर्क साधला आणि तेथून ते संयुक्त प्रांत पंजाब मध्ये गेले. ब्रिटिश सैन्यातील भारतीयांची संघटना त्यांनी मोठ्या कौशल्याने बांधली .

त्यांनी १८५७ च्या बंडा प्रमाणे सैनिकांचे बंड उभारण्याचे ठरविले .या बंडाखाली अमेरिकेतून चार हजार लोक आले होते. बंड सुरू होताच आणखी २० हजार लोक येणार होते.

बरेचसे इंग्रज सैन्य युरोपमध्ये गेले होते. हिंदी सैन्य एक मार्च १९९५ रोजी युरोपात पाठविणार होते. म्हणून रासबिहारी यांनी २१ फेब्रुवारी १९९५ हा बंडाचा दिवस ठरविला होता .बॉम्ब नि शस्त्रास्त्रे जमविली. लोहमार्ग उडविणे व तारायंत्रे नष्ट करून लाहोर ,काशी ,जबलपूर, रावळपिंडी, ढाक्का, मिरत या ठिकाणी एकाच वेळी बंडाची उठावणी करण्याचे नक्की ठरविले .पण कृपाल सिंग नावाच्या घरभेद्याने ही माहिती पोलिसांना दिली आणि कट फुटला .परंतु पिंगळे विविध छावणीतील सैनिकांना फित वण्याचे काम करीतच राहिले. लाहोरच्या क्रांतिकारकांच्या तळावर पोलिसांनी धाडी घातल्या पण रासबिहारी व पिंगळे तिथून निसटले. बनारसहून दहा बॉम्ब घेऊन घोडदळाच्या नादीर खान नावाच्या सैनिकासह ते मिरतला गेले .

२३ मार्चला त्यांना मिरतला घोडदळाच्या बराकित बॉम्ब व शस्त्रांसह अटक केली. नादीरखानने त्यांचा विश्वासघात केला होता.पिंगळे यांच्यासह ८२ क्रांतीकारकांना अटक झाली. एप्रिल ते सप्टेंबर पर्यंत हा खटला चालला. पिंगळयांनी निडरपणे बंडातील आपला भाग मान्य केला. इतर सहा जणांसह त्यांना फाशीची शिक्षा झाली. इंग्रज पोलीस अधिकारी चार्ल्स क्लीव्ह लॅडने .. तू माफीचा साक्षीदार हो, तुझी फाशी रद्द करून काळया पाण्याची जन्मठेप करतो.. अशी लालूच पिंगळयांना दाखविली. पण या स्वाभिमानी आणि ध्येयवादी क्रांतिकारकाने ती नाकारली. १६ नोव्हेंबर १९९५ रोजी त्यांना फाशी देण्याचे ठरले. त्यांच्या विनंतीवरून त्यांच्या बेड्या काढण्यात आल्या. त्यांनी हात जोडून परमेश्वराची प्रार्थना केली व स्वतःच्या हाताने फासाचा दोर गळयात घालून, ते फासावर चढले.म्हणाले .. हे परमेश्वरा तू आमचा ध्येयवाद ओळखतोस मातृभूमीला स्वतंत्र करणे ही आमची इच्छा होती. आता आम्ही आमच्या प्राणाचे बलिदान करीत आहोत .आमची इच्छा तू पूर्ण कर.. ही त्यांचीअखेरची प्रार्थना १५ ऑगस्ट १९४७ रोजी परमेश्वराने पूर्ण केली.

लेफ्टनंट गव्हर्नर सर मायकेल ओडवायर याला या बलिदानाने पिंगळयांविषयी कमालीचा आदर वाटला. विष्णू पिंगळे यांना सरस्वतीची आराधना करता आली नाही, पण स्वातंत्र्य देवतेची उपासना करता करता त्यांनी मृत्यूला आलिंगन दिले. अनेकांना क्रांतीची प्रेरणा देणारे हे धि रोदात्त मरण होते.



**डॉ. आनंदराव सूर्यवंशी**

# कृषी विभागाच्या पुरस्कारांसाठी

### प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**दैनिक ठाणे जीवन दिप वार्ता**
**पेण(प्रतिनिधी)**

कृषी विभागामार्फत सन-२०२३ या वर्षांमध्ये जिल्ह्यातील कृषी व संलग्न क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्ती, गट, संस्थानी विविध कृषी पुरस्कारांसाठी प्रस्ताव नजीकच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडे सादर करावेत असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी केले आहे.

राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत राज्यात कृषी आणि संलग्न क्षेत्र तसेच फलोत्पादन क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या, कृषी उत्पादन आणि उत्पन्न वाढीकरीता योगदान देणाऱ्या शेतकऱ्यांचा तसेच कृषी विस्तारामध्ये बहुमोल कामगिरी करणाऱ्या व्यक्ती, संस्था,गट यांना डॉ.पंजाबराव देशमुख, कृषीरत्न पुरस्कार, वसंतराव नाईक कृषीभूषण पुरस्कार, जिजामाता कृषीभूषण पुरस्कार, सेंद्रीय शेती कृषीभूषण पुरस्कार, उद्यानपंडीत पुरस्कार,वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार, युवा शेतकरी पुरस्कार व कृषी विभागामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार प्रदान करुन सन्मानित करण्यात येते. अधिक माहितीसाठी नजीकच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.



**कल्याण डोंबिवली महापालिका सेवेतील प्रकाश गवारी व किशोर पांडे यांनी प्रकाश मोपारी (वरिष्ठ लिपिक सुरक्षा विभाग) यांना त्यांच्या सेवानिवृत्ती सोहळयात पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.**

# ह्युमॅनिटी स्टील लाईव्हच्या मार्फत अनोखा थर्टी फर्स्ट साजरा



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी) :**

ह्युमॅनिटी स्टील लाईव्ह च्या मार्फत तेजस सांगळे व त्यांचे सहकारी मुकुल सोनटक्के, आदित्य लासुरे, सुधीर शेट्टी, शुभम शुक्ला, श्रीराम अय्यर व अन्य सहकारी यांच्या मार्फत थर्टी फर्स्ट च्या पार्ट्या झुगारत गोरगरीब गरजूंना मोफत जेवण व ब्लँकेट वाटप करण्यात आले. हा उपक्रम गेले पंधरा वर्षे झाले करण्यात येत आहे. सरत्या वर्षाला २०२४ ला गुड बाय करत २०२५ मध्ये वेलकम करत कोणत्यातरी गोरगरिबांचे एक दिवसाचा पोट भरून व त्यांच्या अंगावर वस्त्र देण्यात आले. आपल्याला देवाने अन्न वस्त्र निवारा या सर्व गोष्टी दिल्या आहेत. तरीही आपण आपल्यापासून वंचित असलेल्या लोकांना या सर्व गोष्टी पुरवाव्यात आणि पुढच्या वर्षी या उपक्रमाला कल्याणातल्या नागरिकांनी भरभरून प्रतिसाद द्यावा अशी प्रतिक्रिया तेजस सांगळे यांनी दिली.

### राष्ट्रीय आट्या पाट्या स्पर्धेसाठी

# ठाणे जिल्ह्यातील खेळाडू व प्रशिक्षक निवड

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी) :**

ठाणे जिल्हा आट्या पाट्या असोसिएशन चे अध्यक्ष आप्पा शिंदे यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र राज्य आट्या पाट्या महामंडळाच्या मान्यतेने ४ ते ६ नोव्हेंबर दरम्यान ३७ वी पुरुष व ३४ वी महिला सिनियर महाराष्ट्र राज्य आट्या पाट्या अजिंक्यपद स्पर्धा खडवली, कल्याण येथे आयोजित करण्यात आली होती.



या स्पर्धेतून ठाणे जिल्ह्यातील पुरुष गटातून एजाज तडवी, चारुदत्त काळे यांची आणि महिला गटातून वैभवी चव्हाण, अनुराधा मोरे यांची आट्या पाट्या फेडरेशन ऑफ इंडिया आयोजित ३ ते ५ जानेवारी दरम्यान, शेगाव , बुलढाणा येथे होणाऱ्या ३७ वी पुरुष ३३ वी महिला सिनियर राष्ट्रीय आट्या पाट्या अजिंक्यपद स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ठाणे जिल्हा आट्या पाट्या असोसिएशन सचिव, मार्गदर्शक व राष्ट्रीय पंच संजय काळे यांची महाराष्ट्राच्या महिला संघाचे प्रशिक्षक म्हणून निवड झाली. राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आलेल्या ठाणे जिल्ह्यातील सर्वांचे अध्यक्ष आप्पा शिंदे तसेच सर्व पदाधिकाऱ्यांनी विशेष कौतुक केले.

# ठाणे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे कार्यालय स्थलांतरित

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता**
**ठाणे(प्रतिनिधी)**

बेलापूर येथील कोकण भवनात असलेले ठाणे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे कार्यालय आता खारेगाव कळवा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे स्थलांतरीत झाले आहे. अर्जदार यांनी त्यांच्या जात दाव्याबाबत उपरोक्त पत्त्यावर संपर्क करावा, असे आवाहन उपायुक्त तथा सदस्य श्रीम. प्राची वाजे व संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव श्री. प्रसाद खैरनार यांनी केले आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अतंर्गत असलेले ठाणे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय नवी मुंबईतील कोकण भवन येथे होते. आता हे कार्यालय, खारेगाव-कळवा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा मजला, दत्तवाडी बस स्टॉप जवळ, खारेगांव कळवा, ठाणे, पिन कोड ४००६०५ येथे नवीन जागेत स्थालांतरित झाले आहे. जात दाव्यासंदर्भात अर्जदारांनी कार्यालयाच्या नवीन पत्त्यावर संपर्क साधावा, तसेच नविन अर्जदारांनी त्यांचे जात प्रमाणपत्र पडताळणी बाबतचे प्रस्ताव विहित नमुन्यात ऑनलाईन तसेच मूळ प्रत विहित कालावधीत उपरोक्त नवीन पत्त्यावरील कार्यालयात समक्ष जमा करावे, असे आवाहन उपायुक्त तथा सदस्य श्रीम. वाजे यांनी केले आहे.

# कृषी विभागाच्या विविध पुरस्कारांसाठी व्यक्ती,गट,संस्थानी प्रस्ताव सादर करावेत

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता**
**रायगड(प्रतिनिधी)**

कृषी विभागामार्फत सन-२०२३ या वर्षांमध्ये जिल्ह्यातील कृषी व संलग्न क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्ती, गट, संस्थानी विविध कृषी पुरस्कारांसाठी प्रस्ताव नजीकच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडे सादर करावेत असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी केले आहे.

राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत राज्यात कृषी आणि संलग्न क्षेत्र तसेच फलोत्पादन क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या, कृषी उत्पादन आणि उत्पन्न वाढीकरीता योगदान देणाऱ्या शेतकऱ्यांचा तसेच कृषी विस्तारामध्ये बहुमोल कामगिरी करणाऱ्या व्यक्ती, संस्था,गट यांना डॉ.पंजाबराव देशमुख, कृषीरत्न पुरस्कार, वसंतराव नाईक कृषीभूषण पुरस्कार, जिजामाता कृषीभूषण पुरस्कार, सेंद्रीय शेती कृषीभूषण पुरस्कार, उद्यानपंडीत पुरस्कार,वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार, युवा शेतकरी पुरस्कार व कृषी विभागामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार प्रदान करुन सन्मानित करण्यात येते. अधिक माहितीसाठी नजीकच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

## भविष्यातील पाणथळ संवर्धनासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सहभाग




**दैनिक ठाणे जीवन दिप वार्ता/ ठाणे(प्रतिनिधी)**

- राज्यभरातील विविध जिल्ह्यांमध्ये सर्वेक्षणानुसार ५६४ पाणथळींबाबत उत्सुकता लागून राहिली आहे. याच पार्श्वभूमीवर दरवर्षी पाणथळ भूमीदिनानिमित्त होणाऱ्या राष्ट्रीय परिषदेत 'भविष्यासाठी पाणथळभूमींचे संरक्षण' या संकल्पनेवर आधारित विविध व्याख्याने तसेच चर्चासत्र पार पडणार आहेत. त्याचप्रमाणे यात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा देखिल सहभाग असणार आहे.

देशभरातील २.३१ लाख पाणथळ जागा संरक्षित करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाच्यावतीने सर्व राज्य प्राधिकरणाला देण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यातील ५६४ पाणथळींकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. याच पार्श्वभूमीवर पाणथळ संरक्षणासाठी स्वच्छ खाडी अभियान अंतर्गत पर्यावरण दक्षता मंडळ, एनव्हायरो विजिल, महाराष्ट्र कांदळवन आणि सागरी जैवविविधता संवर्धन प्रतिष्ठान, मुंबई विद्यापीठ आणि असोसिएशन ऑफ टीचर्स इन बायोलॉजिकल सायन्सेस यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय परिषदेचे आयोजव करण्यात आले आहे. पाणथळभूमी दिनानिमित्त दरवर्षी ही परिषद होत असते. यंदाची परिषद 'भविष्यासाठी पाणथळींचे संरक्षण' या विषयावर असणार आहे. यावेळी वेटलैंड्स इंटरनॅशनल साउथ एशियाचे डायरेक्टर डॉ. रितेश कुमार यांचे व्याख्यान असणार आहे. तसेच यावेळी महाराष्ट्र कांदळवन आणि सागरी जैवविविधता संवर्धन प्रतिष्ठानच्या वतीने खारफुटी परिसंस्था आणि जैवविविधता संवर्धन या विषयावर मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच देशातील विविध पाणथळभूमीवर चालु असलेले शोधकार्य, अभियान, चळवळी आणि संवर्धनात्मक प्रयत्न याविषयी चर्चा होणार आहे. ही परिषद शनिवार, १ फेब्रुवारी रोजी मुंबई विद्यापीठाच्या कलिना कॅम्पसमध्ये असणार आहे.

पाणथळ संवर्धनासाठी पथनाट्य ठाणे जिल्ह्यातील एकूण १४ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले होते. पाणथळ संवर्धन आणि पाणथळींवर अवलंबून असणारी जीवसृष्टी या विषयावर हे पथनाट्य सादक झाले होते. यातील एक पथनाट्याचे सादरीकरण परिषदेच्यावेळी करण्यात येणार आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना पाणथळभूमी संवर्धनामध्ये सहभागी करून घेण्याच्या उद्देशाने विविध स्पर्धा आयोजित करण्यात आले होते. यामध्ये पाणथळभूमी छायाचित्रण स्पर्धा, लघुचित्रफित स्पर्धा, फलक तयार करणे स्पर्धा घेण्यात आल्या. यातील अनेक फलक आणि शोधनिबंधांचे परिषदेच्यावेळी सादरीकरण केले जाणार आहे.

## डोंबिवली रेल्वे स्थानक भागात
# फेरीवाल्यांसाठी १५० मीटरची सीमारेषा

**दैनिक ठाणे जीवन दिप वार्ता डोंबिवली(प्रतिनिधी)**

डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानक भागातील फडके रस्ता, बाजीप्रभू चौक, इंदिरा चौक, पाटकर रस्ता, नेहरू रस्ता हे सर्वाधिक वर्दळीचे भाग म्हणून ओळखले जातात. या भागातील रस्ते, चौक वाहने, नागरिकांसाठी पूर्णपणे खुले असले पाहिजेत या विचारातून पालिकेच्या फ प्रभागाच्या साहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांनी डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानकापासून १५० मीटर पर्यंत एक सीमारेषा आखून दिली आहे. या सीमारेषेच्या आत व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांवर कायदेशीर, दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे.

डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानक भागातील फ, ग प्रभाग कार्यालया कडून रेल्वे स्थानक परिसरातील फेरीवाले हटविण्याची मोहीम सकाळी नऊ ते रात्री दहा वाजेपर्यंत सुरू असते. मागील अनेक महिन्यांच्या कारवाईनंतर ग, फ प्रभाग हद्दीतील बहुतांशी फेरीवाले सततच्या कारवाईमुळे अन्य भागात व्यवसाय करण्यासाठी निघून गेले आहेत. काही फेरीवाले रेल्वे स्थानक भागातून हटण्यास तयार नाहीत.

आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी रेल्वे स्थानक परिसरातील रस्ते, चौक नागरिकांसाठी पूर्णपणे खुले पाहिजेत असे आदेश यापूर्वीच दिले आहेत. या आदेशाप्रमाणे फ प्रभागाच्या साहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांनी आपल्या




फ प्रभाग हद्दीतील डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानक भागात रेल्वे स्थानकापासून दीडशे मीटरपर्यंत सफेद पट्टे आखून घेतले आहेत. या सफेद पट्ट्यांच्या आत एकाही फेरीवाल्याने व्यवसाय करू नये. ही सीमारेषा मोडून कोणी फेरीवाल्याने व्यवसाय केला तर त्यांच्यावर दंडात्मक आणि फौजदारी कारवाई केली जाणार आहे. फेरीवाल्यांसाठी या सीमारेषा इंदिरा चौक, बाजीप्रभू चौक, फडके रस्ता, नेहरू रस्ता भागात मारण्यात आल्या आहेत. रामनगर, राजाजी रस्ता, शिवमंदिर रस्ता परिसर ग प्रभागाचे साहाय्यक आयुक्त संजयकुमार कुमावत यांनी फेरीवाला मुक्त केला आहे. फ आणि ग प्रभागाची फेरीवाला हटाव पथके सकाळपासून रेल्वे स्थानक भागात तैनात राहत असल्याने डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानक परिसर फेरीवाला मुक्त होत आहे.

डोंबिवली पश्चिमेतील रेल्वे स्थानक भागात काही फेरीवाल्यांना बसून द्यावे म्हणून ह प्रभागातून बदली झालेला एक कामगार ह प्रभागात लुडबुड करत असल्याचे तक्रारदार नागरिक, फेरीवाल्यांच्या चर्चेतून समजते.

## विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच नव्याचा शोध घेतला पाहिजे

**- केडीएमसी अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड**



### दोन दिवसीय महानगरपालिका स्तरीय विज्ञान प्रदर्शनाची सांगता

**दैनिक ठाणे जीवन दिप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी)**

विद्यार्थ्यांनी शालेय अभ्यासाबरोबरच दैनंदिन जीवनातही वैज्ञानिक दृष्टीकोन ठेवून आपल्या जीवनातील समस्या सोडवल्या पाहिजे व नव्याचा शोध घेतला पाहिजे असे प्रतिपादन कल्याण डोंबिवली महानगर पालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी शिक्षण विभागातर्फे आयोजित महापालिका स्तरीय आंतरशालेय विज्ञान प्रदर्शन पारितोषिक वितरण सोहळयाप्रसंगी आपल्या भाषणात केले.

दि. ३० व ३१ डिसेंबर रोजी अचिवर्स महाविदयालय येथे संपन्न झालेल्या या दोन दिवसीय महानगरपालिका स्तरीय विज्ञान प्रदर्शन पारितोषिक वितरण कार्यक्रमास महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, महापालिका सचिव किशोर शेळके, शिक्षण विभागाचे उपायुक्त प्रसाद बोरकर, प्रशासन अधिकारी रमेश चव्हाण, शिक्षणाधिकारी विजय सरकटे व इतर मान्यवर उपस्थित होते. विज्ञान प्रदर्शनात महानगरपालिका स्तरावर प्रथक क्रमांक मिळविण्याचा मान कल्याण डोंबिवली महानगर पालिका शाळा क्र. ५५ खारी आंबिवली, व्दितीय क्रमांक मिळवण्याचा मान कल्याण डोंबिवली महानगरपालिका शाळा क्र. ३९ कचोरे तसेच तृतीय क्रमांक मिळवण्याचा मान कल्याण डोंबिवली महानगर पालिका शाळा क्र. ९२/५ घासबाजार यांना मिळाला.

त्याचबरोबर महापालिका स्तरावर उत्तेजनार्थ २ पारितोषिके कल्याण डोंबिवली महानगर पालिका शाळा क्र.६८ बारावे व कल्याण डोंबिवली महानगर पालिका शाळा क्र.८७/३ डोंबिवली (प.) या शाळेस मिळाले.तसेच खाजगी शाळांमधून प्रथम क्रमांक मिळविण्याचा मान डॉन बॉस्को हायस्कुल डोंबिवली (प.), व्दितीय क्रमांक मिळवण्याचा मान वाणी विदयालय शाळा हायस्कुल, तृतीय क्रमांक मिळवण्याचा मान मुस्लिम उर्दु स्कुल या शाळेस मिळाला. त्याबरोबर चंद्रकांत पाटकर मराठी हायस्कुल व सेंट थॉमस हायस्कुल या शाळेच्या विज्ञान प्रकल्पांस उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

पाटील बालमंदिर इंग्लिश प्राथमिक शाळा, मोहने या शाळेचा कु. यश चव्हाण हया विदयार्थ्यांस उत्कृष्ट सादरीकरणाचे बक्षीस मिळाले व टिळकनगर विदयामंदिर डोंबिवली या शाळेची राधिका वैदय ही बक्षीस समारंभ कार्यक्रमाचे खरे आकर्षण ठरली तिला विज्ञान प्रदर्शनात 'उत्कृष्ट सादरीकरण विदयार्थिनी' हे बक्षीस मिळाले तसेच तिच्या मनोगतातून सुंदर अशा शब्दफेक, नेमके विचार, मुद्देसुद बोलण्याने सर्वांचेच मन खिळवून गेले आणि महापालिकाचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड हयांच्याकडून कौतुकाची थाप मिळवली.

उपस्थित प्रमुख अतिथींनी विदयार्थ्यांच्या विज्ञान प्रकल्पांची पाहणी करुन प्रदर्शनास भेट दिली. या विज्ञान प्रदर्शनात ६४ प्रकल्प सादर झाले, या प्रदर्शनातून उत्कृष्ट व उपयोगी असे क्रमांक प्राप्त प्रकल्प जिल्हा स्तरावर सादर होणार आहेत. विदयार्थ्यांनी सादर केलेल्या विज्ञान प्रकल्प व पुढील वाटचालीस महापालिकाचे सचिव किशोर शेळके यांनी विदयार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. विदयार्थ्यांनी विज्ञान या शास्त्राचा आपल्या विकासाठी उपयोग केला पाहिजे असे मत त्यांनी हयावेळेस व्यक्त केले. २९ वर्षे सातत्याने पार पडत असलेल्या विज्ञान प्रदर्शन कार्यक्रमास विदयार्थी शिक्षक व त्यांचे पालक यांचे सहकार्य मिळत आहे.या पारितोषिक वितरण सोहळयाचे अहवाल वाचन शिक्षणाधिकारी विजय सरकटे यांनी करुन विज्ञान प्रदर्शनाचा थोडक्यात आढावा घेतला व कार्यक्रमाचे आभार व्यक्त केले. शिक्षण विभागाचे प्रशासनाधिकारी रमेश चव्हाण, शिक्षणाधिकारी विजय सरकटे तसेच समावेशित शिक्षणाचे समन्वयक मिलिंद अहिरे व सर्व विज्ञान समिती सदस्य यांच्या अथक प्रयत्नातून हे विज्ञान प्रदर्शन संपन्न झाले.

## ग्रंथोत्सवात केवळ १०० ते १५० पुस्तकांची खरेदी



**दैनिक ठाणे जीवन दिप वार्ता/ नवी मुंबई(प्रतिनिधी)**

- येथील कोपरखैरणे परिसरात भरवण्यात आलेल्या ग्रंथोत्सवातील पुस्तक विक्रीच्या दालनातून दोन दिवसात केवळ १०० ते १५० पुस्तकांची खरेदी झाली असल्याची माहिती समोर आली आहे. जिल्ह्यातील विविध प्रकाशकांची १० दालने या ग्रंथोत्सवात होती. पहिल्या दिवशी वाचक आणि साहित्यप्रेमींच्या अनुपस्थितीमुळे पुस्तकांची खरेदरी कमी झाली होती. दुसऱ्या दिवशी पुस्तकांची खरेदी सर्वाधिक होईन अशी शक्यता प्रकाशकांना होती. परंतू, दुसऱ्या दिवशीही पुस्तक खरेदीला अल्प प्रतिसाद मिळाला असल्याची भावना काही प्रकाशकांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय आणि ज्ञान विकास संस्था, कोपरखैरणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'ठाणे ग्रंथोत्सव २०२४' या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या ग्रंथोत्सवात ग्रंथप्रदर्शन आणि साहित्यिक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या ग्रंथ प्रदर्शनाला जिल्ह्यातील केवळ दहा प्रकाशकांची पुस्तकांची दालने होती. कविता संग्रह, कथासंग्रह, आत्मकथा, कादंबरी, बालसाहित्य, शब्द संग्रह, स्पर्धा परिक्षा संदर्भातील पुस्तके, कायदे विषयक पुस्तके, राजकीय तसेच शेअर बाजार संबंधित असे विविध पुस्तके या प्रदर्शनात मांडण्यात आली होती. ग्रंथोत्सवाच्या पहिल्या दिवशी अवघ्या काही साहित्यप्रेमींनीच या ग्रंथोत्सवाला भेट दिली होती. त्यामुळे पहिल्या दिवशी कमी प्रमाणात पुस्तकांची खरेदी झाली. दुसऱ्या दिवशी या खरेदी वाढ होईल अशी अपेक्षा प्रकाशकांनी केली होती. परंतू, दुसरा दिवशी देखील पुस्तकांची कमी खरेदी झाल्याची खंत काही प्रकाशकांनी व्यक्त केली. प्रत्येक पुस्तक दालनात दोन दिवसात केवळ १० ते १५ पुस्तकांची खरेदी झाल्याची माहिती सुत्रांनी दिली.

**विद्यार्थ्यांना 'एक' पुस्तक खरेदी करण्याचे आवाहन**

ठाणे जिल्हा ग्रंथोत्सव २०२४ कोपरखैरणे येथील ज्ञान विकास संस्थेच्या शाळेत भरविण्यात आले होते. त्यामुळे या ग्रंथोत्सवाला या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी यासाठी संस्थेच्या अध्यक्षांनी ग्रंथोत्सवाच्या पहिल्या दिवशी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना पुस्तक खरेदी करण्याचे आवाहन केले होते. प्रत्येक विद्यार्थ्याने एक तरी पुस्तक खरेदी करावे असे त्यांच्या कडून सांगण्यात आले होते. त्यानुसार, काही विद्यार्थ्यांनी शैक्षणिक विषयावर आधारित, शब्ध संग्रह आणि काही कविता संग्रहाची पुस्तके खरेदी केली.

**या पुस्तकांचा समावेश**

बटाट्याची चाळ, दोस्त, मुंबई ही महाराष्ट्राचीच, छत्रपती संभाजी, डोंगरयात्रा, लोक माझे सांगाती, श्यामची आई, कर्मवीर भाऊराव पाटील, फकिरा, अग्निपंख, गुंतवणूकीचे मानसशास्त्र, झपुर्झा, इन्फोटेक असे विविध लेखकांची तसेच शेअर बाजार संबंधितील पुस्तकांचा या प्रदर्शनात समावेश होता.

जिल्ह्याचा ग्रंथोत्सवाला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळेल अशी अपेक्षा होती. परंतू, याठिकाणी पहिल्याच दिवसापासून फार कमी साहित्यप्रेमींची उपस्थिती लाभली होती. त्यामुळे पुस्तक खरेदीलाही अल्प प्रतिसाद मिळाल्याची खंत एका प्रकाशकांनी नाव न सांगण्याच्या अटीवर लोकसत्ताशी बोलताना व्यक्त केली.

## पत्रकार अशोक कांबळे यांना पितृशोक

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी)**

कल्याण : कल्याण मधील पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते अशोक कांबळे यांचे वडील नामदेव कांबळे यांचे अल्पशा आजाराने मंगळवारी वयाच्या ८५व्या वर्षी निधन झाले. बुधवारी सकाळी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी समाजातील सर्वच स्तरातील मान्यवरासह सर्वसामान्यांनी अंत्ययात्रेत सहभाग घेत उपस्थित राहिले होते. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, जावई, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

## पुन्हा एकदा हास्यजत्रेची टीम प्रेक्षकांना खळखळून हसवणार

### चित्रपटातून देणार धमाल मनोरंजनाची ट्रीट

पुन्हा एकदा हास्यजत्रेची टीम प्रेक्षकांना खळखळून हसवणार, चित्रपटातून देणार धमाल मनोरंजनाची ट्रीट सगळीकडे नववर्षाच्या उत्साहाचे वातावरण असताना स्वप्नील जोशी, प्रार्थना बेहरे, प्राजक्ता माळी, प्रसाद महादेव खांडेकर, रोहित माने, प्रथमेश शिवलकर, वनिता खरात ही नामवंत कलाकार मंडळी 'चिकी चिकी बुबूम बुम' म्हणत आपल्याला हसवायला सज्ज झाले आहेत. या चित्रपटाचे गमतीशीर पोस्टर प्रदर्शित झाले असून यात स्वप्नीलचा हटके लूक दिसतोय तर बाकीचे कलाकार



घाबरलेल्या आणि गोंधळलेल्या अवस्थेत दिसतायेत. त्यामुळे ही भानगड काय आहे? हे समजायला मार्ग नाही. चित्रपटसृष्टीतील कसलेल्या कलाकारांची भली मोठी फौज आणि धमाल मनोरंजनाची ट्रीट देणारा 'चिकी चिकी बुबूम बूम' चित्रपट येत्या २८ फेब्रुवारीला प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी सज्ज होणार आहे. चित्रपटाची कथा अजून गुलदस्त्यात असली तरी, भन्नाट कलाकार मंडळींच्या एकत्र येण्याने हास्याचे जबरदस्त स्फोट घडतील हे नक्की. नारकर फिल्म्स अँड एंटरटेनमेंट निर्मित, आयडियाज द एंटरटेनमेंट कंपनी प्रस्तुत आणि स्वर्ण पट कथा आणि प्रजाकार प्रोडक्शन्स यांच्या सहयोगाने येणाऱ्या 'चिकी चिकी बुबूम बूम' चित्रपटाचे दिग्दर्शन प्रसाद महादेव खांडेकर यांचे आहे.

## ठाणे ते कर्जत-कसारा शटल सेवा वाढवा

**- आमदार राजेश मोरे**

**दैनिक ठाणे जीवन दिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी)**

प्रवाशांची वाढती गर्दी विचारात घेऊन ठाणे ते कर्जत, कसारा दिशेने जाणाऱ्या शटलच्या फेऱ्या वाढवण्यात याव्यात, अशी मागणी उपनगरीय रेल्वे प्रवासी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांची भेट घेऊन केली. याशिवाय रेल्वे प्रवाशांच्या इतर मागण्यांच्या पूर्ततेसाठी कल्याण लोकसभेचे खासदार, मध्य रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी यांची एकत्रित बैठक घेण्यासाठी पुढाकार घेण्याची मागणी आमदार मोरे यांच्याकडे रेल्वे प्रवासी संघाच्या पदाधिकऱ्यांनी केली.

कर्जत, कसारा भागातून ठाणे, मुंबई परिसरात नोकरी, व्यवसायासाठी जाणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढली आहे. या भागातील प्रवासी ठाणे येथून रेल्वे नवी मुंबई, पनवेल भागात जातो. संध्याकाळच्या वेळेत सीएसएमटी, दादर येथून कल्याण, कर्जत, कसारा, खोपोली रेल्वे स्थानकाकडे सुटणाऱ्या लोकल



प्रवाशांनी तुडुंब भरलेल्या असतात. या खचाखच भरलेल्या लोकलमुळे ठाणे रेल्वे स्थानकात या लोकलमध्ये चढण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या कर्जत, कसाराकडील प्रवाशांना गर्दीच्या लोंढ्यामुळे चढता येत नाही. प्रवाशांच्या या लोकल गेल्यातर त्यांना अर्धा ते पाऊण तास रखडावे लागते. त्यामुळे संध्याकाळी पाच ते रात्री दहा वाजेपर्यंत ठाणे रेल्वे स्थानकातून पंधरा ते वीस मिनिटांच्या अंतराने कर्जत, कसारा, खोपोली, आसनगाव दिशेने शटल सेवा वाढवाव्यात. रेल्वे प्रवाशांच्या या मागणीच्या पूर्ततेसाठी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, मध्य रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी यांची एकत्रित बैठक बोलविण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी रेल्वे प्रवासी महासंघाच्या अध्यक्षा लता अरगडे, ज्येष्ठ सल्लागार नंदकुमार देशमुख, ठाकुर्ली -कोपर रेल्वे प्रवासी संघटनेचे सागर घोणे यांनी आमदार मोरे यांच्याकडे केली.

डोंबिवली, कल्याण ही सर्वाधिक वर्दळीची रेल्वे स्थानके आहेत. या रेल्वे स्थानकातील विकास कामे आणि समस्यांविषयी रेल्वे अधिकाऱ्यांबरोबर एक बैठक बोलावून या रेल्वे स्थानकांमधील प्रवासी समस्या मार्गी लावण्यासाठी पुढाकार घ्यावा, मुंबई रेल्वे विकास मंडळाकडून सुरू असलेले विकास प्रकल्पांना गती मिळण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशा मागण्या आमदार मोरे यांच्याकडे करण्यात आल्या आहेत.


'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 g Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अॅड. जयकुमार ए. रिजवानी